Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- I JANUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणिव जागृतीचे विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. उज्वला स. नवले**
मारिया अध्यापक महाविद्यालय तुकूम,
चंद्रपूर, महाराष्ट्र

**सारांश:**

*जंगलात वन्यप्राणी असणे हे समृद्ध जंगलाचे प्रतिक आहे. त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. आपला भारत समृद्ध जैवविविधता लाभलेला एक देश आहे. येथे जंगलात प्राणी वनस्पती, पक्षी यामध्ये प्रचंड वैविध्य आढळते. पण गेल्या काही वर्षापासून ही संपत्ती धोक्यात आली आहे. त्यामुळे त्यांचे रक्षण होणे अत्यावश्यक आहे. भावी पिढीला घडविण्यांचे कार्य हे शिक्षकांना करायचे आहे. व हे भावी शिक्षक त्यांच्या प्रशिक्षणामधूनच पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेची जाणीव जागृती करू शकतात. या कारणाने वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणीव जागृती करून देणे आवश्यक आहे. ही गरज व विषयाचे महत्व लक्षात घेुन संशोधन विषयाची निवड केली. यात प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला .चंद्रपूर शहरातील मारीया अध्यापक महाविद्यालयातील एकूण ४० छात्राध्यापकांची सहेतूक न्यादर्श पद्धतीने निवड करून त्यांना पूर्व चाचणी, कृतीकार्यक्रम व उत्तर चाचणी यामध्यमाव्दारे माहिती संकलन करण्यात आले. छात्राध्यापकांमध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धन याविषयी सकारात्मक जाणिव व जागृती निर्माण व्हावी म्हणून तयार केलेल्या कृती कार्यक्रम राबविल्यामुळे छात्राध्यापकांमध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणिवेत लक्षणीय फरक आढळून आला असे निष्कर्ष काढण्यात आले.*

**प्रस्तावना :**

आपल्या भारतीय संस्कृतीत वन्यप्राण्यांना महत्व दिलेले आहे. मानवी जीवनाइतकेच वन्यजीवन हे पुरातन आहे. पूर्वी घनदाट अरण्ये असल्यामुळे वन्यजीवांचे आपोआपच रक्षण होत असे. पण २० व्या शतकापासून लोकसंख्यावाढ, जंगलतोड, औद्योगिकीकरण, यामुळे जंगले नष्ट झाली. पर्यायाने तेथील समृद्ध वन्यजीवनही मोठ्या प्रमाणावर संपुष्टात आहे. वन्यप्राणी व वन्यजीव यांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासंबंधी सामान्य जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याची आज गरज आहे. जंगलात वन्यप्राणी असणे हे समृद्ध जंगलाचे प्रतिक आहे. त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. आपला भारत समृद्ध जैवविविधता लाभलेला एक देश आहे. येथे जंगलात प्राणी वनस्पती, पक्षी यामध्ये प्रचंड वैविध्य आढळते. पण गेल्या काही वर्षापासून ही संपत्ती धोक्यात आली आहे. त्यामुळे त्यांचे रक्षण होणे अत्यावश्यक आहे. यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्रसंघ आणि पर्यावरणाशी संबंधित विविध संस्था समस्येचे अध्ययन, संशोधन करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. भारत सरकारने वन्यजीव संवर्धन—संरक्षणासाठी कायदे केलेले आहेत. भारतीय अधिनियम १९२७ अन्वये वनक्षेत्राचे व वन्यजीवांचे संरक्षण करता येते. अधिनियम १९७२ अंतर्गत वन्यजीव व वन्यप्राण्यांना राष्ट्रीय उद्याने व अभयरण्याची निर्मिती करून विशेष संरक्षण देता येते. तसेच वने आणि प्राणी यांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती निर्माण करण्यासाठी वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो जेणेकरून वन्यजीवांबद्दल त्यांच्या संरक्षण

संवर्धनाची जनतेमध्ये जाणीव जागृती होईल. या पार्श्वभूमीवर भावी पिढीवर संस्कार करणाऱ्या छात्राध्यापकामध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणिव जागृतीचा अभ्यास आणि कृती कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचे अध्ययन करणे हा प्रस्तुत संशोधनाचा मूलभूत हेतू आहे.

**संशोधनाची गरज आणि महत्व:**

२१ व्या शतकात वन्यजीव संरक्षण व संवर्धन ही जाणीव लोप पावत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धन ही जाणीव जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. कारण हेच भावी पिढीचे नागरीक आहे. निसर्ग निर्मित आपत्तींना प्रत्येकालाच समोरे जावे लागत आहे. कारण निसर्गातील अन्नसाखळी ही संकटात सापडलेली आहे. म्हणून वन्यजीवांबद्दल जिव्हाळा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. पृथ्वीवरील जीवावरणामुळेच मानवाची अन्नाची गरज भागते. जीवावरणातील प्राणी व वनस्पती एकमेकांवर अवलंबून आहेत त्यामुळेच वन्यजीवनाच्या एखाद्या घटकावर काही फरक पडल्यास वन्यजीवनाच्या अधिवासाचे चक्र बिघडते याचा परिणाम मानवी संस्थेवर होतो. निर्सगातील वन्यजीवांमुळेच मानवाचे अस्तित्व टिकूण आहे. याची जाणीव होणे काळाची गरज आहे.

भावी पिढीला घडविण्यांचे कार्य हे शिक्षकांना करायचे आहे. व हे भावी शिक्षक त्यांच्या प्रशिक्षणामधूनच पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेची जाणीव जागृती करू शकतात. शिक्षकांमध्ये ही भावना रूजविणे गरजेचे आहे. म्हणून बी.एड अभ्यासक्रमात पर्यावरण हा विषय अनिवार्य म्हणून दिलेला आहे. कारण वन्यजीवांचे महत्व मानवी जीवनासाठी किती महत्वाचे आहे. याची जाणीव जागृती ते विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करतील. विविध विषयांच्या माध्यमाने व उपक्रमाव्दारे वन्यजीवनांचे महत्व संरक्षण व संवर्धन छात्राध्यापकांना पटवून देउुन त्याची जाणीव जागृती करण्यास प्रेरीत करणे गरजेचे आहे. व हे काम फक्त शिक्षकच करू शकतो. शिक्षण प्रक्रियेचा सुत्रधार शिक्षक याबाबत जर अनभिन्न असेल तर समस्या अधिक बिकट होईल. छात्राध्यापकांध्ये प्रशिक्षणादरम्यान भावनात्मक विकास होणे अपेक्षित असते.म्हणूनच वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणीव जागृती करून देणे आवश्यक आहे. ही गरज व विषयाचे महत्व लक्षात घेउुन संशोधन विषयाची निवड केली.

**समस्या विधान:**

अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणिव जागृतीचे विश्लेषणात्मक अध्ययन

**कार्यात्मक व्याख्या:**

**वन्यजीव** — सर्व नॉन—पाळीव प्राण्यांच्या प्रजातींचा संदर्भ आहे जे मनुष्य नसलेल्या भागात राहतात आणि वाढतात.

**संरक्षण—** वन्य प्रजाती व नामशेष होणाऱ्या प्राण्यांना सुरक्षा प्रदान करणे.

**संवर्धन** — ही वन्य प्रजाती व त्यांचे वास्तव्य संरक्षित करण्याची प्रथा आहे. यात प्रजाती नष्ट होउु नये यासाठी प्रयत्न केले जाते.

**कृती कार्यक्रम** — वन्यजीव संरक्षण व संवर्धन विषयक जाणीव जागृतीसाठी आखलेला कृतीयुक्त कार्यक्रम.

**जाणीव जागृती** — कृती कार्यक्रमाच्या अनुभवातून विद्यार्थ्यांच्या वन्यजीव संरक्षण व संवर्धन विषयक जाणीवांमध्ये झालेला बदल.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१.अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांमधील वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणिवेचा शोध घेणे.

२.अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांमध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणिव जागृतीसाठी कृतीकार्यक्रम राबविणे.

३.वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणीव जागृतीसाठी राबविलेल्या कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाच्या परिकल्पना (शून्य परिकल्पना):**

कृतीकार्यक्रम राबविला तरी छात्राध्यापकांच्या वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणिव जागृतीत लक्षणीय फरक आढळून येत नाही.

**जनसंख्या :**

चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शिक्षण महाविद्यालयातील छात्राध्यापक सदर संशोधनाची जनसंख्या होय.

**न्यादर्श:**

सदर संशोधनासाठी मारीया अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांची निवड असंभाव्यतेवर आधारित सहेतुक नमुना निवड पद्धतीने केली आहे. यासाठी ४० छात्राध्यापकांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

**व्याप्ती** – सदर संशोधनाचे निष्कर्ष चंद्रपूर जिल्ह्यातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांना लागू होतील.

**मर्यादा** – सदर संशोधनात विद्यार्थ्यांच्या लिंग, वय, सामाजिक दर्जा व बाह्य घटकांवर नियंत्रण ठेवले जाणार नाही. संशोधनाचे निष्कर्ष हे केवळ प्रतिसादकांवर अवलंबून राहतील. सदर संशोधन हे वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणिव जागृतीसाठी कृतीकार्यक्रमापूरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनाच्या विषयाचे स्वरूप लक्षात घेता प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**अभिकल्प :**

एकलगट अभिकल्प (पूर्व व उत्तर चाचणी)

**संशोधनाची साधने:**

शैक्षणिक संशोधनामध्ये विश्वासार्ह, वैध, गुणात्मक व परिमाणात्मक संशोधन आधार सामुग्रीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करून संशोधनाचे निष्कर्ष काढावे लागतात. सदर संशोधनासाठी संशोधिका निर्मित पूर्व चाचणी व उत्तर चाचणी या साधनांचा वापर करण्यात आला. आवश्यक घटकांवर कृतीकार्यक्रम आयोजित केला यात व्याख्यान, चर्चा, व क्षेत्रभेट इत्यादीचा समावेश केला.

**सांख्यिकीय साधने:**

न्यादर्शातील अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांकडून प्राप्त झालेल्या आधारभूत माहितीच्या विश्लेषणाकरिता मध्यमान, प्रमाण विचलन, ज.अंसनम या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग करण्यात आला.

**संशोधन कार्यपद्धती:**

समस्या निश्चिती
↓
छात्राध्यापकांना पूर्व चाचणी देणे
↓
कृतीकार्यक्रम राबविणे
↓
छात्राध्यापकांना उत्तर चाचणी देणे
↓
संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण, अर्थनिर्वचन.
↓
निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधनाकरिता प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यादृच्छिक पद्धतीने अध्यापक महाविद्यालयाची निवड करून एकलगट अभिकल्प प्रयोगाकरिता निवडला आहे. वन्यजीव संरक्षण व संवर्धन या विषयी माहिती अनेक माध्यमातून संकलीत करून ३० विधाने असलेली एकूण ३० गुणांची पूर्व चाचणी व उत्तर चाचणी तयार करण्यात आली. पूर्व चाचणीच्या आधारे छात्राध्यापकांमधील वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणिव जागृतीचा अभ्यास करण्यात आला. त्यानंतर इंटरनेटवरील व्याख्यान, चर्चासत्र, मासिके व प्रसार माध्यमे याद्वारे माहिती व जाणिव व जागृती केली तसेच ताडोबा क्षेत्रभेट देण्यात आली. पूर्ण कृतीकार्यक्रम राबविल्यानंतर उत्तरचाचणी सोडविण्यास देण्यात आली. पूर्व चाचणी व उत्तर चाचणीच्या आधारे माहिती संकलित केली. संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करून ‘ ज ’ मूल्य काढण्यात आले व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यात आले.

**पूर्वचाचणी व उत्तर चाचणीचे विश्लेषण:**

| अ. क्र. | गट | छात्राध्यापकांची संख्या N | मध्यमान M | प्रमाण विचलन S.D | 't' मूल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पूर्व चाचणी | ४० | ११.६५ | २.१३ | २९.१४ | सार्थक |
| २. | उत्तर चाचणी | ४० | २६.२२५ | २.३८ | | |

**विश्लेषण :**

अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांमधील वन्यजीव संरक्षण व संवर्धनतेच्या जाणीव जागृतीमधील पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यामधील फरक अभ्यासण्याकरिता श्ज' मूल्ये काढण्यात आले. उपरोक्त सारणीवरून प्राप्त श्जश मूल्य २९.१४ आढळले. श्जश मूल्याची सार्थकता ०.०१ स्तराकरीता २.७१ तर ०.०५ स्तरावर २.०२ आवश्यक आहे. प्राप्त मूल्य २९.१४ हे ३८ कि साठी ०.०१ आणि ०.०५ या स्तरावर आवश्यक मूल्यापेक्षा जास्त असल्यामुळे हा फरक ०.०१ आणि ०.०५ स्तरावर सार्थक आहे म्हणून मांडलेल्या शून्य परिकल्पनेचा त्याग करण्यात आला.

**निष्कर्ष:**

१. अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांमध्ये कृतीकार्यक्रमामुळे वन्यजीव संरक्षण व संवर्धन ही संकल्पना स्पष्ट झाली.
२. अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांमध्ये क्षेत्रभेटीमुळे वन्यजीव प्राण्यांचे प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे वन्यजीव प्राण्याबद्दल जागृती निर्माण झाली.
३.वन्यजीव संरक्षण व संवर्धन प्रत्येकाची जबाबदारी आहे हे छात्राध्यापकांनी समजून घेतले.
४. अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांमध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धन याविषयी सकारात्मक जाणिव व जागृती निर्माण व्हावी म्हणून तयार केलेल्या कृती कार्यक्रम राबविल्यामुळे छात्राध्यापकांमध्ये वन्यजीव संरक्षण व संवर्धन जाणिवेत लक्षणीय फरक आढळून आला.

**शिफारशी :**

१. महाविद्यालयामध्ये परिसंवाद,कृतीसत्रे यांचे आयोजन करावे, जेणेकरून छात्राध्यापक त्यामध्ये सक्रिय सहभाग घेतील.
२. वन्यजीव संरक्षण सप्ताह यामध्ये युवा पिढींचा सहभाग घेणे.
३. अध्यापक महविद्यालयातील छात्राध्यापक भावी शिक्षक असल्यामुळे त्यांना शासनाचे वन्यजीव संरक्षण व संवर्धन उपक्रमात त्यांचे मत जाणून घ्यावीत.व त्यांचा सहभाग घ्यावा.
४. विद्यार्थ्यांत पर्यावरणाविषयी आपुलकी निर्माण करण्यासाठी त्यांच्या मन:शक्तीवर चांगले संस्कार केले पाहिजे.
५. शासनाने युवा पिढीत सकारात्मक प्रेरणा निर्माण करण्यासाठी योजना आखून त्यात युवा पिढीचा समावेश करून घ्यावा.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. आगलावे, प्रदिप ; २००१ संशोधन पद्धती व तंत्रे नागपूर, विद्या प्रकाशन
२. खोरपडे, अभिजित; २००१ ग्लोबल वार्मिंग, पुणे, राजहंस प्रकाशन
३.घोरमोडे, के.यु. ; २००८ शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, पुणे, श्री विद्या प्रकाशन
४.जगताप ह.ना. ; १९८८ शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन
५.भोसले आरती ; २०१७ पर्यावरण शिक्षण ,जळगाव, प्रशांत पब्लिकेशन
६.भितांडे वि.रा. ; १९८९ शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन
७.भांडारकर, के.एम. १९८७ सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ
८- www.researchgate.net